# **Possitive Stories**

गडचिरोली, दिनांक ०८/०६/२०१७

## *जपतलाई गावामध्ये दोन तोतया नक्षलवादी अटकेत*

काल दिनांक ०७/०६/२०१७ रोजी जपतलाई या गावातुन दोन तोतया नक्षलवादी भिसारु तटकु गोटा, वय-२५ वर्षे व साहेबराव सुखदेव कुजूर वय- ५० वर्षे यांना येरकड पोलीसांनी अटक केली आहे.

दिनांक ०६/०६/२०१७ रोजी संध्याकाळी ०७.०० वा. च्या आसपास आरोपी भिसारु गोटा व साहेबराव कुजूर हे मौजा जपतलाई येथे गेले. त्याठिकाणी किशोर बाबूराव हलामी हे तेंदूपत्ता संकलनाचे लोकांचे पैसे वाटप करीत असता आरोपींनी संगनमत करुन किशोर हलामी यांचे जवळ जावून आम्हाला नक्षलवाद्यांनी पाठवले आहे, आम्हाला वाटप करीत असलेल्या तेंदुपत्ता संकलनाच्या पैशातून दहा हजार रुपये दे. नाहीतर तुला याच ठिकाणी जिवानीशी मारुन टाकू अशी धमकी दिली. परंतु किशोर हलामी यांनी वाटप करीत असलेले पैसे लोकांचे असून ते पैसे तुम्हाला द्यावयाचे किंवा कसे याबाबत गावकऱ्यांशी बोलुन उद्या सकाळी सांगतो असे सांगितले. तेंदुपत्ता संकलनाचे पैसे हे कष्टाचे असल्याने नक्षल्यांना पैसे न देण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला. आरोपी हे दुसऱ्या दिवशी दिनांक ०७/०६/२०१७ रोजी सकाळी किशोर हलामी यांचेकडे गेले. यावेळी गावकऱ्यांनी तोतया नक्षलवाद्यांना पकडून त्याबाबतची माहीती येरकड पोलीसांना दिली. त्यानंतर पोलीसांनी गावात जावून आरोपींना ताब्यात घेतले.

भिसारु गोटा व साहेबराव कुजूर यांचेविरुध्द पोस्टे धानोरा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मा. न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोन दिवसांचा पीसीआर मंजूर केला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोउपनि किरण वराळ हे करीत आहेत.




शिष्यवृत्ती